18-06-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 6/17/2025 11:05 PM Page 1



# प्रियकरानेच चिरला प्रेयसीचा गळा

■ टीम दैनिक हेराल्ड



**फोंडा, दि. १७:** धारबांदोडा येथे प्रतापनगरमधील काजू बागेत सापडलेल्या एका अज्ञात युवतीच्या हत्येचा गुन्हा केवळ २४ तासांत उघडकीस आणण्यात फोंडा पोलिसांना यश आले असून, या प्रकरणात पीडितेचा प्रियकर संजय केविन (२२, मूळ रहिवासी लिगराजपुरम, बंगळुरू) याला अटक करण्यात आली आहे.

पाच वर्षांच्या तणावग्रस्त प्रेमसंबंधातून उगम पावलेल्या या गुन्ह्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडवली आहे. पीडितेची ओळख रोशनी मोजेस (२२, लिगराजपुरम, बंगळुरू) अशी पटली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित आणि आरोपी हे दोघेही रविवारी (१६ जून) कदंब बसने बंगळुरू आणि हुबळीमार्गे गोव्यात दाखल झाले होते. प्रवासादरम्यानच त्यांच्यात जोरदार वाद झाला. यानंतर रात्री उशिरा प्रतापनगर येथे उतरल्यावर आरोपीने जवळ असलेल्या धारदार शस्त्राने युवतीचा गळा चिरून तिची निर्घृण हत्या केली आणि तिथून पळ काढला. तिच्यावरच्या संशयातून तिच्या प्रियकराने ही हत्या केल्याची शक्यता प्राथमिक चौकशीनंतर व्यक्त केली जात आहे .

हत्येनंतर आरोपी तिस्क–उसगाव येथे चालत आला आणि टॅक्सी भाड्याने घेण्याचा प्रयत्न केला. सुरुवातीला तो कळंगुटला जायचं आहे असे सांगत होता, परंतु नंतर कुटुंबाकडून फोन आला आहे, मी बंगळुरूला जायचं ठरवलं आहे, असे सांगू लागला. त्याच्या वागण्यात सातत्य

## फोंडा पोलिसांनी केला २४ तासात उलगडा

नसल्याने टॅक्सीचालकाला संशय आला. त्याने त्याचे आधार कार्ड मागून त्याचा फोटो काढून ठेवला.

आरोपीने हुबळी येथे टॅक्सी सोडली आणि बसने पुढे बंगळुरूकडे रवाना झाला. दरम्यान, स्थानिकांच्या मदतीने मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेज, बसचे तिकीट, आणि रोशनीच्या पर्समध्ये सापडलेले मोबाइल व ' यूपीआय' व्यवहारांचे तपशील यांवरून पोलिसांनी तिची ओळख पटवली आणि आरोपीपर्यंतचा तपास पक्का केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी संजय केविन याने चौकशीदरम्यान गुन्ह्याची कबुली दिली आहे. गोवा प्रवासादरम्यान झालेल्या वादातूनच त्याने खून केल्याचे त्याने सांगितले. हा गुन्हा पूर्णपणे वैयक्तिक संबंधातील ताणतणावातून घडल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे.

पोलिस उपअधीक्षक (डीवायएसपी) शिवराम वायंगणकर यांच्या नेतृत्वाखाली फॉरेन्सिक तज्ज्ञ, डॉग स्क्वॉड आणि स्थानिक पथकांनी घटनास्थळाची बारकाईने तपासणी करून महत्त्वाचे पुरावे गोळा केले. सीसीटीव्ही, फोन रेकॉर्ड्स, बँक व्यवहार आणि लोकल इंटेलिजन्सच्या साहाय्याने आरोपीची अचूक ओळख पटवण्यात आली.या गंभीर हत्याकांडाचा तपास अत्यंत प्रभावीपणे हाताळत फोंडा पोलिसांनी अवघ्या २४ तासांत गुन्हा उघडकीस आणला. या जलद कारवाईबद्दल स्थानिक स्तरावर पोलिसांचे कौतुक होत आहे. प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

# बेवारस वाहनांवरील कारवाईत पक्षपात ?



■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १७:** मडगाव शहरातील रस्त्यांवर दीर्घकाळ बेवारस अवस्थेत ठेवण्यात आलेली वाहने वाहतुकीस अडथळा ठरत असून, स्थानिक प्रशासनाच्या निवडक दृष्टिकोनावर जागरूक नागरिकांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. बेवारस वाहनांची यादी तयार करताना पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोप करत नागरिकांनी ती यादी अपूर्ण आणि पक्षपाताची असल्याचे म्हटले आहे.

शहरातील विविध ठिकाणी अनेक महिने उभ्या असलेल्या दुचाकी आणि चारचाकी वाहनांची खात्रीशीर नोंद यादीत नाही, हे निदर्शनास आल्यानंतर मडगावकरांच्या संतापाला ऊत आला आहे. स्थानिक रहिवासी किशोर नाईक यांनी सांगितले की , मुख्य आणि अंतर्गत रस्त्यांवर आजही अनेक बेवारस वाहने अडथळा ठरत आहेत. मात्र काही कारणास्तव ती वाहनं अधिकृत यादीत नाहीत. ही यादी अपूर्ण असून निवडक स्वरूपातच तयार करण्यात आली आहे, हे स्पष्टपणे दिसते.

या नागरिकांच्या मते, अशा यादीचा उद्देश कायद्यानुसार कारवाई करणे असले तरी प्रत्यक्षात ती निवडक स्वरूपात तयार होत असल्यामुळे काही प्रभावशाली गाड्यांना जाणूनबुजून वगळण्यात आले आहे.

याच मुद्द्यावरून संताप व्यक्त करत अँड्र्यू सूझा यांनी म्हटले की , ही यादीच अनेक प्रश्न उपस्थित करते. काही वाहनांना यादीतून जाणीवपूर्वक वगळल्याचे दिसते, आणि त्यामागे राजकीय दबाव किंवा वैयक्तिक हितसंबंध असण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही प्रभावशाली व्यक्ती त्यांच्या बेवारस वाहनांना हात लागू नये यासाठी प्रशासनावर दबाव टाकत आहेत.

काही नागरिकांनी असा आरोपही केला की, शहरातील एका राजकीयदृष्ट्या जवळीक असलेल्या व्यक्तीने या प्रक्रियेत हस्तक्षेप करत काही वाहने तपासणीपासून वगळली आहेत. त्यामुळे ही संपूर्ण कारवाईच संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

यासंदर्भात अधिक खुलासा आणि कारवाईची मागणी करत नागरिकांनी मडगाव वाहतूक पोलिस व महापालिका प्रशासनाकडे अधिकृतरीत्या पाठपुरावा सुरू केला आहे. त्यांनी संपूर्ण यादी पुन्हा तपासून जमिनीवरील वास्तवाशी पडताळणी करण्याची, तसेच सर्व बेवारस वाहनांवर निष्पक्ष कारवाई करण्याची जोरदार मागणी केली आहे.

हा प्रकार केवळ वाहतुकीस अडथळा ठरणारा नसून, सार्वजनिक सुरक्षिततेसाठीही धोकादायक आहे, असे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी प्रकरणाची गंभीर दखल घेऊन कोणत्याही राजकीय हस्तक्षेपाशिवाय पारदर्शक कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे.

# निविदा मर्यादा लागू करण्याची ट्रान्सपोर्ट असोसिएशनची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १७:** ऑल गोवा रोड ट्रान्सपोर्ट असोसिएशनने रस्ते प्रकल्पांसाठी निविदा नियमांतील सुधारणा तत्काळ मागे घेण्याची मागणी केली आहे. निविदा रकमेवरील २० टक्क्यांची पूर्वीची मर्यादा हटवल्याने प्रकल्पांच्या दर्जावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

ही प्रतिक्रिया सार्वजनिक बांधकाम विभागाच्या २६ मे २०२५ रोजी जारी केलेल्या परिपत्रकाच्या पार्श्वभूमीवर आली असून, त्यात कंत्राटदारांना अंदाजित खर्चापेक्षा कितीही कमी दराने बोली लावण्यास मुभा देण्यात आली आहे.

असोसिएशनचे अध्यक्ष दीपक देसाई यांनी याबाबत सांगितले की, डांबरासारख्या आवश्यक साहित्यांच्या किमती सतत चढ–उतार करत असताना, अतिशय कमी दराने निविदा स्वीकारल्यास गुणवत्तेची हमी देणे शक्य होत नाही. परिणामी, बांधकाम टिकाव धरत नाही आणि पावसाळ्यात रस्त्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते, असे त्यांनी नमूद केले.

देसाई यांनी असा इशाराही दिला की, सध्याच्या धोरणामुळे बाहेरील कंत्राटदारांना आकर्षण वाटेल, जे खूपच कमी दराने निविदा दाखल करून काम मिळवू शकतात, पण त्यांच्या कडे ना पुरेशा यंत्रणा असतात ना स्थानिक जबाबदारी. ही स्पर्धा आरोग्यदायी न राहता गुणवत्तेच्या खात्यावर होते, असे ते म्हणाले.

संघटनेने सध्याच्या खुल्या धोरणाऐवजी किमान १० टक्के मर्यादा कायम ठेवण्याची शिफारस केली आहे, जेणेकरून स्पर्धात्मकता राखली जाईल आणि कामाचा दर्जाही सुनिश्चित करता येईल.

निविदा प्रक्रियेव्यतिरिक्त, देसाई यांनी रस्ते विकासातील विभागीय समन्वयाचा अभावही अधोरेखित केला. पीडब्ल्यूडी , वीज आणि सांडपाणी विभागांमध्ये समन्वय नसल्यामुळे नुकतेच बांधलेले रस्ते केबल किंवा पाइपलाइनसाठी पुन्हा खोदले जातात. हे सार्वजनिक निधीचा थेट अपव्यय आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

संघटनेने रस्ते नियोजन व देखभाल या संदर्भात सर्व संबंधित विभागांमध्ये समन्वय साधण्याची गरज अधोरेखित केली. वारंवार होणाऱ्या खोदकामामुळे नागरिक त्रस्त होत असून, एकत्रित धोरण नसेल तर विकास कार्यांचा प्रभाव टिकून राहणार नाही, असा ठाम विश्वास असोसिएशनने व्यक्त केला.ऑल गोवा रोड ट्रान्सपोर्ट असोसिएशन लवकरच सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राज्य सरकारकडे अधिकृत निवेदनाद्वारे आपली भूमिका आणि शिफारसी मांडणार आहे.

# बालरथ बसमध्ये शॉर्ट सर्किट : मोठी दुर्घटना टळली

■ टीम दैनिक हेराल्ड




**मडगाव, दि. १७:** मडगाव येथील सेंट जोसेफ हायस्कूलजवळ मंगळवारी सकाळी उभ्या असलेल्या बालरथ शालेय बसमध्ये ठिणगी आढळल्याने संभाव्य गंभीर दुर्घटना टळली. बसच्या इंजिन विभागातून धूर व ठिणगी येत असल्याचे लक्षात येताच पालक व विद्यार्थ्यांनी तत्काळ सावधगिरी बाळगत अलार्म वाजवला. शाळेच्या कर्मचाऱ्यांनी तत्परतेने मदत करत परिस्थिती नियंत्रणात आणली.

शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर मारिया पायरेस यांनी दिलेल्या माहितीनुसार वेळीच मिळालेल्या सूचनेमुळे कोणालाही दुखापत झाली नाही. कर्मचाऱ्यांनी आग विझवण्यासाठी त्वरित कारवाई केली. संबंधित बसची वॉरंटी अद्याप वैध आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

आपत्कालीन सेवा आणि शाळेचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी तत्काळ दाखल झाले. प्राथमिक तपासात हा प्रकार इलेक्ट्रिकल शॉर्ट सर्किटमुळे घडल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून, सखोल तपासानंतर नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

घटनास्थळी उपस्थित असलेल्या नागरिकांनी आणि शाळेच्या कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे ही घटना मोठ्या दुर्घटनेत रूपांतरित होण्यापासून टळली. विद्यार्थ्यांची सुरक्षितता जपण्यासाठी वेळेवर आणि योग्य प्रतिसाद देणं किती महत्त्वाचं आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर बालरथ योजनेंतर्गत कार्यरत शालेय वाहनांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, स्थानिक प्रशासनाने सर्व शाळा बसची तातडीने सखोल तपासणी करण्याचे आश्वासन दिले आहे.

घटनेनंतर अनेक पालक आणि नागरिकांनी जलद प्रतिसादाचे कौतुक करत, शालेय वाहतुकीच्या सुरक्षिततेसाठी नियमित देखभाल, तपासणी आणि आपत्कालीन प्रोटोकॉल सुधारण्याची मागणी केली आहे.

जरी ही घटना कोणत्याही जिवीतहानीशिवाय पार पडली असली तरी, विद्यार्थ्यांच्या दैनंदिन प्रवासात असलेल्या धोक्यांकडे प्रशासन आणि शाळा व्यवस्थापनाने अधिक गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

# लहान संघांसाठी कसोटी सामना ४ दिवसांचा होणार

नवी दिल्ली, दि. १७ :




आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने २०२७–२९ च्या जागतिक कसोटी अजिंक्यपद सायकलसाठी लहान क्रिकेट राष्ट्रांना चार दिवसांच्या कसोटी सामन्यांना परवानगी देण्याच्या दिशेने पावले उचलण्याची तयारी केली आहे. तथापि, भारत, इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांसारख्या प्रमुख क्रिकेट राष्ट्रांना पारंपरिक पाच दिवसांच्या कसोटीसाठी परवानगी दिली जाणार आहे, असे द गार्डियन'ने आपल्या अहवालात म्हटले आहे.

आयसीसीच्या धोरणात होऊ घातलेला हा बदल लहान देशांना वेळ आणि आर्थिक मर्यादांमुळे अधिक कसोटी सामने खेळण्याची संधी देऊ शकतो. विशेषतः तीन कसोटी सामन्यांच्या मालिका आता तीन आठवड्यांच्या आत आयोजित करणे शक्य होईल, असेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.

गेल्या आठवड्यात लॉर्ड्स येथे झालेल्या जागतिक कसोटी अजिंक्यपद अंतिम सामन्यादरम्यान झालेल्या बैठकीत, आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांनी चार दिवसांच्या कसोटींना पाठिंबा दर्शविल्याचे वृत्त आहे. या पार्श्वभूमीवर, २०२७–२९ जागतिक कसोटी अजिंक्यपद सायकलमध्ये हा बदल लागू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

भारत, इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया या क्रिकेट महासत्ता मात्र आपापसात खेळल्या जाणाऱ्या बॉर्डर–गावस्कर ट्रॉफी, ॲशेस आणि नव्याने जाहीर झालेल्या अँडरसन–तेंडुलकर ट्रॉफीसाठी पाच दिवसांच्या कसोटी मालिकाच खेळतील. या ट्रॉफीची पहिली मालिका २० जूनपासून हेडिंग्ले येथे भारत–इंग्लंड सामन्याने सुरू होणार आहे.

आयसीसी ने २०१७ मध्ये प्रथमच द्विपक्षीय सामन्यांसाठी चार दिवसांच्या कसोटी सामन्यांना मंजुरी दिली होती. त्यानंतर २०१९ आणि २०२३ मध्ये इंग्लंडने आयर्लंडविरुद्ध आणि नुकतेच मे महिन्यात ट्रेंट ब्रिज येथे झिम्बाब्वे विरुद्ध चार दिवसांचे सामने खेळले होते.

चार दिवसांच्या कसोटीसाठी आयसीसी ने दररोज ९८ षटके खेळवण्याचा प्रस्ताव दिला आहे, जे पारंपरिक ९० षटकांपेक्षा अधिक आहेत. यामुळे चार दिवसांमध्ये पूर्ण कसोटी सामन्याचे आयोजन शक्य होईल. वेळेची बचत आणि खर्च नियंत्रणात ठेवणे हे यामागे उद्दिष्ट आहे.

गेल्या आठवड्यात लॉर्ड्समध्ये पार पडलेल्या डब्ल्यूटीसी अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियावर विजय मिळवून दक्षिण आफ्रिकेने जेतेपद पटकावले. मात्र, या देशाच्या व्यस्त प्रवास कार्यक्रमामुळेआयसीसी ची गरज प्रकर्षाने जाणवली, असेही अहवालात म्हटले आहे.

आयसीसीने स्पष्ट केले आहे की, सध्या सुरू असलेली २०२५–२७ डब्ल्यूटीसी सायकल मात्र पाच दिवसांच्या पारंपरिक स्वरूपातच खेळवली जाणार आहे. या कालावधीत ९ देशांत २७ कसोटी मालिका खेळवल्या जातील. त्यातील १७ मालिका फक्त दोन कसोटी सामन्यांची असतील, तर सहा मालिका तीन कसोट्यांची असतील.

भारत, इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया हे तीनही संघ एकमेकांविरुद्ध प्रत्येकी पाच कसोटी सामन्यांची मालिका खेळतील. दरम्यान, श्रीलंका मंगळवारपासून बांगलादेशविरुद्ध दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेची सुरुवात करणार आहे.

# सांडपाण्याच्या सुविधेअभावी रहिवाशांना त्रास का ?

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १७:** लिंबो परिसरातील रहिवासी सांडपाणी सुविधेच्या अभावामुळे हैराण झाले असताना, मडगाव नगरपरिषद आणि सांडपाणी विभाग यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे प्रशासकीय गोंधळ अधिकच वाढला आहे. जुन्या मॉडेल हायस्कूलजवळील जवळपास डझनभर घरे गेल्या काही महिन्यांपासून या समस्येचा सामना करत आहेत.

अलीकडेच मडगाव नगरपरिषदेने १२ रहिवाशांना कारणे दाखवा नोटीस बजावल्या असून त्यात आरोप करण्यात आला की त्यांनी वादळी नाल्यांमध्ये सांडपाणी सोडल्याने शेती क्षेत्र आणि सालपेम तलावात प्रदूषण होत आहे. मात्र रहिवाशांचा यावर ठाम आक्षेप आहे. *आमच्या भागात कधीच सांडपाणी पाइपलाइन टाकलेली नाही. आम्हाला जोडणीच उपलब्ध नाही, मग आम्ही दोषी कसे ?* असा सवाल रहिवासी अँथनी परेरा यांनी उपस्थित केला.

सांडपाणी विभागाच्या म्हणण्यानुसार, पाईपलाइन टाकण्यासाठी एका स्थानिक बिल्डरच्या मालकीच्या खाजगी जमिनीवरून मार्ग जाणे आवश्यक असून, त्या जमीनमालकाकडून 'ना हरकत प्रमाणपत्र' मिळवणे आवश्यक आहे. मात्र संबंधित बांधकाम व्यावसायिकाने ना हरकत प्रमाणपत्र देण्यास स्पष्ट नकार दिला आहे.

या उलट, मडगाव नगरपरिषदेचे म्हणणे आहे की सार्वजनिक कामांसाठी ' एनओसी' आवश्यक नाही. त्यामुळे दोन्ही विभागांचे विरोधाभासी म्हणणे रहिवाशांसाठी संभ्रमाचे आणि त्रासाचे कारण बनले आहे.

*जर मडगाव नगरपरिषद म्हणत असेल की ' एनओसी' आवश्यक नाही, तर त्यांनी सांडपाणी विभागाशी समन्वय साधून काम पुढे न्यायला हवे. रहिवाशांना या प्रशासकीय झगड्यात का अडकवले जाते ? असा संतप्त सवाल परेरा यांनी उपस्थित केला.

कायद्याच्या जाणकारांनी सूचित केले आहे की जर' एनओसी' ही वैधानिक अट नसेल, तर प्रशासन सार्वजनिक हितासाठी मार्गाच्या अधिकाराखाली थेट काम सुरू करू शकते. काही प्रकरणांमध्ये सार्वजनिक हितासाठी जमीन अधिग्रहण कायद्याचा वापरही करता येतो.

दरम्यान, रहिवाशांना या असमंजस परिस्थितीचा दररोज त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सांडपाण्याची योग्य विल्हेवाट न लागल्याने आरोग्याच्या समस्याही उद्भवू शकतात, अशी त्यांची भीती आहे.या प्रकरणामुळे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे की नागरी पायाभूत सुविधांमध्ये विभागीय समन्वय आणि जबाबदारीची स्पष्टता आवश्यक आहे. रहिवाशांनी प्रशासनाकडे तातडीने निर्णय घेऊन सार्वजनिक हितास प्राधान्य देण्याची मागणी केली आहे.